(१)

महावितरण

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ९९ दिनांक 29/03/2007

विषय : दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधित झालेल्या व्यक्ती लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परिक्षेसाठी लेखनिक पुरविणेबाबत.

संदर्भ : १. शासनाचे अवर सचिव,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय यांचे पत्र क्र.संकीर्ण-२००७/संक्र.९९/१००/ऊर्जा-२ दि.२४.०१.२००७.
२. सह सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय यांचे पत्र क्र.संकीर्ण-२००७/प्र.क्र.४३८/प्रशासन-४ दिनांक १२.०२.२००७.

......

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ तरतुदीनुसार दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधित झालेल्या व्यक्ती यांच्या पदभरतीकरिता ज्या पदांबाबत लेखी परिक्षा घेण्यात येतात त्यावेळी त्यांना लेखनिकाचे सहाय्य घेण्यास परवानगी देण्यात येत नसल्याचे मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे.

२. या संदर्भात सह सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांच्या दिनांक १२.२.२००७ च्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.७०/२००२ व १२९/२००३ सुनावणीच्या दरम्यान दिलेल्या आदेशाची प्रत आणि शासनाचे अवर सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या संदर्भिय क्र.१ च्या पत्रासोबत आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र शासन, पुणे यांजकडून प्राप्त झालेल्या क्र.अकआ/प्र-७/लेखनिक/सुविधा/२००६-०७/२९५१ दि.२०.१२.२००६ च्या परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

३. सर्व नियुक्ती अधिका-यांनी मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिकेबाबत दिलेल्या सूचना आणि अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या दिनांक २०.१२.२००६ च्या आदेशांचे अवलोकन करावे व दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधित झालेल्या व्यक्ती लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परिक्षेसाठी लेखनिक पुरविण्याबाबतच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(सु. य. पाटील)
मुख्य महाव्यवस्थापक (क)

प्रत :
१) क्षेत्रीय कार्यालयातील सर्व मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता
२) निगम कार्यालय, मुंबई येथील सर्व विभाग प्रमुख व कक्ष प्रमुख

K/Adm.Circular F.N.348
09/03/07

3/५

(२)

(१)

मा.मुंबई उच्च न्यायालय प्रकरण प्राधान्य

क्र.अकआ/प्र-७/लेखनिक/सुविधा/
२००६-०७/२९५१
**अपंग कल्याण आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य, ३ चर्चरोड, पुणे-१**
**दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०६१/२६१२६४७१**
**फॅक्स क्र. (०२०-२६१११५९०)**
दिनांक - २० डिसेंबर, २००६.

# परिपत्रक

**विषय : दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधित झालेल्या व्यक्ती लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परिक्षेसाठी लेखनिक पुरविणेबाबत..**

संदर्भ : १) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५

२) मा.मुंबई उच्च न्यायालय यांचे याचिका क्रमांक ७०/२००२ व १२९/२००३ प्रकरणात दिनांक १६ नोव्हेंबर, २००६ चे आदेश.

३) मुख्य आयुक्त, अपंग कल्याण, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे इंग्रजी पत्र क्र. २७-ओ.आर/ (३) / सीसीडी / ९९,दिनांक१४/०५/२००३ व क्र. २७ - ओ आर (३) / सीसीडी / ९९ / ६६०८, दिनांक ०२/०८/२०००.

४) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, परिपत्रक क्रमांक अपंग-२००६/प्र.क्र.१०५/सुधार-३, दिनांक १ डिसेंबर, २००६.

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील तरतूदीनूसार व **मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्रमांक ७०/२००२ व १२९/२००३ संदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार** सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागात त्यांच्या अखत्यारीत असलेला अपंगांचा अनुशेष तातडीने भरण्याचे आदेश आहेत. सदर न्यायालयीन प्रकरणात असे दिसून आले आहे की, दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधित झालेल्या व्यक्ती यांच्या पदभरतीकरीता ज्या पदांबाबत लेखी परिक्षा घेण्यात येतील त्यावेळी त्यांना लेखनिकाचे सहाय्य घेण्यास परवानगी देण्यात येत नाही. यामुळे सदर व्यक्तींवर होणारा अन्याय टाळण्याच्या दृष्टीने सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना कळविण्यात येत आहे की, **अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील प्रकरण क्रमांक ५ व ६ मधील तरतूदीनूसार** दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधित झालेल्या व्यक्ती यांना लेखनिक उपलब्ध होण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

## शैक्षणिक परिक्षा / नेमणूकीसाठी घ्यावयाची परिक्षा यासाठी अपंग उमेदवारांना लेखनिकाची सवलत देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे.

१) अपंग उमेदवाराला परिक्षेसाठी लेखनिक हा परिक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्याने पुरवावा अथवा उमेदवाराने त्यांची इच्छा असल्यास स्वत: लेखनिकाची व्यवस्था करावी.

२) परिक्षेच्या वेळी पर्यवेक्षक आणि समवेक्षक यांनी योग्य ते पर्यवेक्षण करुन फसवणूकीचे किंवा तत्सम गैर प्रकार होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३) प्रत्यक्ष अडचणी विचारात घेवून जर परिक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्याने लेखनिक पुरविला असल्यास, त्या प्राधिकाऱ्याने त्या लेखनिकाची सक्षमता तपासून निश्चित करुन घ्यावी.

४) परिक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्याने नेमणूकीच्या जाहिरातीमध्ये लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत सुस्पष्ट उल्लेख करावा.

५) उमेदवारांने परिक्षा आयोजित करणाऱ्या संबंधित यंत्रणेकडून लेखनिक घेणार आहे किंवा उमेदवार स्वत: लेखनिकाची व्यवस्था करणार आहे याचा अर्जात स्पष्ट उल्लेख करावा.

६) परिक्षा घेणाऱ्या यंत्रणेने परिक्षेच्या आवश्यकते प्रमाणे लेखनिकाची निवड करुन जिल्हा / विभागीय किंवा राज्य पातळीवर त्यांचे पॅनेल तयार करावे.

७) लेखनिकाचे पॅनेल हे आवश्यकते प्रमाणे त्या-त्या शाखेनुसार उदा. कला, वाणिज्य, विज्ञान, गणित, अभियांत्रिकी, वैद्यकीय इ. विषयाप्रमाणे करावे व फक्त पात्र आणि सक्षम लेखनिकाचा त्या पॅनेल मध्ये समावेश करावा.

८) शक्यतो परिक्षार्थी व लेखनिक हे एकाच शाखेचे असावेत.

९) उमेदवाराने स्वत:चा लेखनिक आणला असेल व जर तो लेखनिक आणि उमेदवार एकाच शाखेचे असतील तर तो लेखनिक उमेदवाराचे शैक्षणिक पात्रते पेक्षा एक पायरी / टप्पा कमी असावा. मात्र लेखनिक व उमेदवार भिन्न शाखेचे असल्यास त्यास ही अट लागू राहणार नाही.

१०) वर उल्लेखलेल्या शिवाय इतर कोणतेही निर्बंध लेखनिकाच्या निवडीवर असू नयेत.

११) काही अपवादात्मक परिस्थितीत परिक्षा सुरु होण्याच्या ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार मुख्य समवेक्षक यांना राहतील.

१२) वेगवेगळया विषयाच्या पेपरसाठी एका पेक्षा अधिक लेखनिक वापरता येणार नाहीत. मात्र वरील ११ प्रमाणे अपवादात्मक परिस्थितीमध्ये बदल करण्याची परवानगी देण्यात येईल.

१३) लेखनिकाच्या मान्यता पत्रात खालील माहिती / तपशील नमूद करण्यात यावी.

१. परिक्षेसाठी उमेदवारास द्यावयाचा जादा वेळ

२. लेखनिकाच्या वेगळे / स्वतंत्र बसण्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था

३. प्रत्येक पेपरवर परिक्षेचा दिनांक, विषय याबरोबरच लेखनिकाचे नांव इ. तपशील छापण्यात येणार असल्याची माहिती.

४. अपवादात्मक परिस्थितीत लेखनिक बदलने आवश्यक असल्यास, त्यासाठी सक्षम प्राधिकारी यांचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक

(३)

१४) लेखनिकास अल्पोपहार घ्यावयाचा असल्यास त्यांने तो परिक्षेच्या अगोदर किंवा नंतर घ्यावा.
१५) उमेदवार व लेखनिक यांना परिक्षेच्या वेळा बद्दल संपूर्ण माहिती देण्यात यावी.
१६) अतिरिक्त वेळ :-

१. लेखी परिक्षा एक तासाची असल्यास त्यासाठी किमान २० मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात यावा.

२. त्याच प्रमाणे परिक्षेचा कालावधी एक तासापेक्षा अधिक असल्यास अतिरिक्त वेळ देताना प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ याप्रमाणे गणना करावी.

१७) परिक्षेच्या वेळी उमेदवारांचा गोंधळ व संभ्रम टाळण्यासाठी परिक्षा सुरु होण्याच्या पूर्वी योग्य अशी बैठक व्यवस्था करण्यात यावी.
१८) अपंगांसाठी बसण्याची व्यवस्था शक्यतो तळ मजल्यावर करण्यात यावी.
१९) प्रश्न पत्रिकेमधील मूळ प्रश्नांत दृष्य बाबी समाविष्ट असल्यास अथवा उमेदवाराकडून अशा दृष्य बाबींचा अर्थ लावणे किंवा दृष्य बाबींचे सादरीकरण करणे अपेक्षीत असल्यास अशा प्रश्नांचे ऐवजी पर्यायी प्रश्न पुरविण्यात यावेत. मात्र उमेदवारास उत्तर देण्यासाठी पर्यायी प्रश्नांचे ऐवजी मूळ प्रश्न निवडण्याची मुभा राहील.
२०) दृष्टीहीन उमदेवारांना उत्तर पत्रिका लिहीताना ब्रेलचा वापर करण्याची किंवा संगणक अथवा टंकलेखन यंत्र वापरण्याची मुभा राहील. ब्रेल लिपीमधील उत्तर पत्रिकेचे मुल्यांकन हे ब्रेल लिपी जाणणाऱ्या तज्ञ /परिक्षक यांच्याकडून करावे. शक्य झाल्यास प्रश्न पत्रिका ब्रेल लिपीमध्ये अथवा डिजिटल टेक्सट (Digital text) मध्ये पुरविण्यात यावी.
२१) एस.एस.सी / एच.एस.सी. परिक्षा मंडळे, सर्व विद्यापीठे, सर्व शैक्षणिक संस्था आणि सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी वरील सूचनांचे पालन करावे.

२०/१२/२००६

आयुक्त, अपंग कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत : माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.**
१) मा.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
**प्रति : माहिती व कार्यवाहीस्तव.**
१) सर्व ~~अपर मुख्य सचिव~~ / ~~प्रधान सचिव~~ / सचिव मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (ऊर्जा)
२) सर्व विभागीय आयुक्त — उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
३) सर्व जिल्हाधिकारी — महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
५) विभागीय समाज कल्याण अधिकारी (सर्व)
६) विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई शहर / उपनगर.
७) सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
८) सर्व सेवायोजन अधिकारी, जिल्हा सेवायोजन केंद्रे

वरिष्ठ लिपीक
अपंग कल्याण आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

महाराष्ट्र शासन

**अति तात्काळ**

क्रमांकः-अपंग-२००२/प्र.क्र.३३१/सुधार-३
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांकः- १९ जानेवारी २००७.

प्रति,

सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सर्व प्रशासकीय विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.

विषय :- जनहित याचिका क्र.७०/०२ व १२९/०३ याबाबत कार्यवाहीबाबत.

महोदय,

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ ची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.७०/०२ व १२९/०३ ची सुनावणी दि. २१.१२.२००६ रोजी त्यावेळी शासनाला कार्यवाही करण्यासाठी मार्गदर्शक सूचना देऊन सदर याचिका निकाली काढण्यात आल्या आहेत. दि.२१ डिसेंबर २००६ रोजीच्या न्यायालयीन आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. अंध व्यक्तींना परीक्षा देण्यासाठी सहाय्य व्हावे यासाठी लेखनिकाची तरतूद करण्याचे दि.२०.१२.२००१ चे परिपत्रक आयुक्त, अपंग कल्याण,पुणे यांनी सर्व प्रशासकीय विभागांना यापूर्वीच पाठविले असून मा.उच्च न्यायालयाच्या दि.२१.१२.२००६ च्या न्यायालयीन आदेशात नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार लेखनिकांचे जिल्हा / विभाग व राज्य स्तरावरील पॅनेल तयार करण्याचे काम तीन महिन्यांच्या आत पूर्ण करावयाचे आहे. तरी त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करुन त्याची माहिती या विभागास देण्यात यावी,ही विनंती. आयुक्त, अपंग कल्याण यांच्या दि.२०.१२.२००१ च्या परिपत्रकाची प्रत त्वरीत संदर्भासाठी सोबत जोडली आहे.

आपला,

(ज. न. राठोड)
उप सचिव

(9)

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY

CIVIL APPELLATE JURISDICTION

PIL Writ Petition No.70 of 2002

ILS Legal Aid Centre and Ors. ..Petitioners.
vs
The State of Maharashtra and ors. ..Respondents

Mr Uday Warunjikar for the petitioners.
Mr. A.A.Kumbhakoni, Associate Advocate General, with Mr P.I. Khemani, AGP for respondent nos.1,3,4 and 5
Mr. J.K. Mistry, i/b M/s Sanjay Udeshi and CO for respondent No.10.
Mr. D.D. Mehta, i/b M/s Mulla and Mulla & Cragie Blunt and Caroe, for respondent No.11
Mr. K.K.Singhvi Senior Advocate for respondent No.14
Mr. R.S. Apte for Intervener.

With PIL Writ Petition No.129 of 2003

The National Federation of Blind, Maharshtra ..Petitioner
vs
State of Maharashtra and ors. ..Respondents

Mr. Uday Warunjikar for the petitioner.
Mr. A.A. K & J Pawar for respondent Nos 1 and 8
Mr. A.A.Garge i/b Mr. R.S. Apte for respondent No.3
Mr. P.P.Chavan i/b Little and Co for respondent No.5.

CORAM: H.S. BEDI, C.J. ,&
V.M.KANADE, J.
DATE: 21st December, 2006.

P.C.:-

Heard the learned counsel for the parties at some length on several occasions. It has been pointed out by Mr. Kumbhakoni, learned Associate Advocate General that the

backlog for employment for physically challenged or disabled persons has been largely filled up though some vacancies still exist. We accordingly direct that the State Government shall ensure that the backlog will be cleared not later than six months from today.

Mr. Warunjikar, the learned counsel for the petitioner has drawn our attention to the order of this court dated 26th April 2006 and pointed out that the final Government Resolution pertaining to the matter in hand can not be issued without the prior permission of this court and that the Government has not even taken the petitioners and other interested parties concerned into confidence with the result that till date no Government Resolution has even been framed. Mr. Kumbhakoni, has however, stated that a draft Government Resolution has been prepared in accordance with the suggestions made by the Committee set up by this Court and that this draft will be handed over to the learned counsel for all the parties herein and including those appearing in person and that before the Government Resolution is formally issued, suggestions of all concerned would be given serious consideration. Mr. Mistry, the learned counsel appearing for

some of the parties has also pointed out that several issues as regards posting and promotion of physically challenged persons also arise for consideration. The learned counsel appearing for the interveners in Civil Application No.50 of 2006 has pointed out that the State Government had issued advertisements inviting applications from partially blind candidates ignoring those who were completely blind and as such those who suffered higher disabilities were being left out as their applications were not being accepted. We therefore request the learned counsel for the intervener to hand over the applications and her suggestions to Mr. Kumbhakoni who will forward the same to the Committee concerned. Mr. Kumbhakoni also states that the panel of writers who are required for helping those who are physically challenged will be completed not later than three months from today. With the above directions we dispose of these petitions as infructuous but with a rider that if any party or counsel feels that the State Government is not acting fairly or in accordance with the directions issued by this court from time to time, they would be at liberty to move this court in this very petition.

TRUE COPY
DEPUTY REGISTRAR
HIGH COURT, APPELLATE SIDE
BOMBAY 400 032